Email - Info@maharashtracrimetimes.com

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंक: ३८ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार १८ डिसेंबर २०१८ ते सोमवार २४ डिसेंबर २०१८

मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019

३ | दहिसर ते वांद्रे कांदळवन क्षेत्र होणार झोपडीमुक्त

भाजप देशभरात ७० पत्रकार परिषदा घेणार | ४

## मोदीनंतर अमित शहा मुंबईत, पराभवानंतर नवा मास्टरप्लॅन?





**मुंबई (विशाल कारंडे)-** भाजप अध्यक्ष अमित शहा बुधवारी मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. यावेळी ते भाजपच्या आमदार आणि खासदारांची बैठक घेणार आहेत. लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीकोनातून पक्षसंघटना मजबूत करणं आणि शिवसेनेला पुन्हा सोबत घेण्याची तयारी दर्शवणं, या नव्या प्लॅनसह भाजप पुन्हा मैदानात उतरण्याची शक्यता आहे. तीन राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत भाजपला जोरदार फटका बसला आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजप आता सावध झाल्याचं पाहायला मिळत आहे. अमित शहा हे त्यांच्या निवडणूक तंत्रासाठी ओळखले जातात. पण राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे महाराष्ट्रात असा फटका बसू नये, म्हणून ते तयारीला लागल्याचं चित्र आहे.अमित शहा हे मुंबई दौऱ्यात अनेक मुद्द्यांचा आढावा घेतील. त्यामध्ये भाजपची राज्यात असलेली राजकीय यंत्रणा हादेखील कळीचा विषय असेल. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाला यश मिळत असलं तरीही काही ठिकाणी फटका बसत आहे. त्यादृष्टीने राजकीय यंत्रणा कशी मजबूत करता येईल, याकडे शहा लक्ष देतील. लोकसभा निवडणूक अगदी काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. अशातच लोकसभेच्या ४८ जागा असलेला महाराष्ट्र भाजपसाठी अत्यंत महत्त्वाचं राज्य आहे. त्यामुळेच लोकसभा निवडणुकीबाबतची रणनीती काय असावी, याबाबत अमित शहा कार्यकर्त्यांशी बोलतील. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी हेदेखील उद्या (मंगळवारी) महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. त्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी पक्षाध्यक्ष अमित शहा मुंबईत दाखल होतील.

## लवकरच काश्मीर स्वतंत्र होणार, हाफिज सईदचा इशारा

**श्रीनगर (योगेश होळंब)-** मुंबई हल्ल्याचा मास्टर माईंड हाफिज सईदने भारतासोबत युद्ध छेडण्याचा इशारा दिला आहे. दोन दिवसांपूर्वी पुलवामामध्ये सैनिकांनी केलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर हाफिज सईदने एक व्हिडीओ जारी केला आहे. ज्यात त्याने लवकरच काश्मीर स्वतंत्र होईल, असा विश्वासही व्यक्त केला आहे. हाफिज सईदने काश्मीरी जनतेला भडकवण्याच्या हेतूने व्हिडीओ बनवला आहे. या व्हिडीओत हाफिजने मोठ्या प्रमाणात गरळ ओकली आहे. पुलवामामध्ये भारतीय सैन्यांनी दहशतवाद्यांना ठार केल्यानंतर स्थानिकांनी दगडफेक केली होती. या दरम्यान सैन्याच्या गोळीबारात सात स्थानिक मारले गेले होते. या हल्ल्याला मुद्दा करत हाफिज काश्मीरच्या नागरिकांना भडकवण्याचा प्रयत्न करत आहे.पुलवामामध्ये ठार झालेल्या दहशतवाद्यांना उद्देशून हाफिज सईद म्हणाला की, 'तुमचं बलिदान व्यर्थ जाणार नाही, तुमच्या बलिदानाची किंमत काश्मीरला स्वतंत्र मिळवूनच घेऊ. आता तो दिवस लांब नाही ज्या दिवशी काश्मीर स्वतंत्र होईल,' असा विश्वास हाफिजने व्यक्त केला. भारत पुर्ण जोर लावत आहे, मात्र तुम्ही मागे हटू नका. आपल्याला यश नक्की मिळेल, असही हाफिज म्हणाला. त्यासोबत त्याने आपल्या व्हिडीओमध्ये भारतासोबत युद्ध छेडण्याचा इशाराही दिला आहे.





## चादर गँगचा धुमाकूळ, दुकान फोडत उल्हासनगरात लाखोंचे मोबाईल लंपास

**कल्याण (तृप्ती गोरे)-** कल्याणनंतर आता व्यापारी शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उल्हासनगरमध्येही चादर गँग सक्रिय झाली आहे. या गँगनं उल्हासनगरचं एक मोबाईल दुकान फोडत त्यातून तब्बल ४६ लाख रुपयांचे मोबाईल लंपास केले आहेत. उल्हासनगरच्या गजबजलेल्या शिवाजी चौकात एक मोठं मोबाईलचं दुकान आहे. या दुकानात आज सकाळी ६ वाजताच्या सुमारास हा प्रकार घडला. दुकानाबाहेर घुटमळत उभ्या असलेल्या सहा जणांच्या टोळीनं अचानक चादर उघडली आणि त्यामागे लपत शटर उचकटून एक चोरटा दुकानात शिरला. या चोरट्यानं दुकानात असलेले ॲपल, सॅमसंग, विवो आणि अन्य कंपन्यांचे तब्बल ४६ लाख रुपयांचे मोबाईल चोरले आणि पोबारा केला.सकाळी १० च्या सुमारास दुकानाचे कर्मचारी दुकान उघडण्यासाठी आले असता त्यांच्या हा प्रकार लक्षात आला. या घटनेनंतर दुकानाचे मालक लक्ष्मण ब्रम्हानी यांनी पोलिसांबद्दल नाराजी व्यक्त केली. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या शिवाजी चौकात दिवसरात्र पोलीस असतात, मात्र तरीही ही चोरी झाली. त्यामुळं आता पोलीस आपली अब्रू वाचवण्यासाठी काय करतात, हे बघावं लागेल, अशी उद्विग्न प्रतिक्रिया ब्रम्हानी यांनी दिली.कल्याणमध्येही सध्या चादर गँगची दहशत पसरल्याचं पाहायला मिळत आहे. ही गँग दुकानाच्या शटरसमोर चादर धरुन अवघ्या काही मिनिटात हात साफ करुन जाते. चार जण एका दुकानाबाहेर येतात, त्यातला एक जण चादर झटकण्याचं नाटक करतो, तर तिघे शटर उचकटतात, याचवेळी त्यांच्यातला एक जण आत जातो आणि आरामशीर दुकान साफ करुन पुन्हा तशाच पद्धतीने बाहेर येतो.कल्याणमध्ये अशाप्रकारे केलेल्या चोरीत एका दुकानातून १८ लाखांचे आयफोन आणि दोन लॅपटॉप, तर दुसऱ्या दुकानातून पाच लाखांचे मोबाईल चोरी करण्यात आले आहेत.



## विनायक मेटेंचा 'शिवसंग्राम' भाजपपासून विभक्त?

**बीड (विनय सैतवडेकर)-** ३ राज्यातील भाजपाच्या पराभवानंतर सत्तेतील साथीदार शिवसेना आक्रमक झाली आहे. राफेल प्रकरण, नोटाबंदी, जीएसटी, महागाई अशा अनेक मुद्द्यांवर भाजपा सरकारला धारेवर धरले जात आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात फडणवीस सरकारला कर्जमाफी, आरक्षण अशा प्रश्नांसोबतच अंतर्गत वादांवरही मात करायची आहे. एकीकडे सत्तेत असलेली शिवसेना सरकार विरोधात आक्रमक झालेली असतांना आता भाजपचा मित्रपक्ष विनायक मेटे यांचा शिवसंग्राम पक्ष बंडाचे निशाण फडकवण्याच्या तयारीत आहे. मंत्रिमंडळ विस्तार होण्याची चिन्हे नाहीत, तेव्हा मंत्रिमंडळ विस्तारात स्थान मिळण्याची शक्यता नाही, असं कारण सांगत विनायक मेटे भाजपापासून विभक्त होण्याच्या मनःस्थितीत आहेत. रविवारी बीडमध्ये झालेल्या शिवसंग्रामच्या कार्यकारणी बैठकीत विनायक मेटे यांनी जिल्ह्यात भाजपाकडून सन्मानयोग्य वागणूक मिळत नसल्याचं कारण सांगत बीड जिल्हापरिषदमध्ये भाजपला दिलेला पाठींबा पक्षाने काढुन घेतला आहे. आता राज्यात भाजपला दिलेला पाठींबा काढण्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.तेव्हा भाजप नाराज विनायक मेटे यांची समजूत काढतो का हे बघणं महत्त्वाचं ठरेल.



## मोदी सरकारमुळे पडलेला ठग्ज ऑफ हिंदुस्तान सिनेमा पुन्हा झळकला

**मुंबई (सम्यक कासारे)-** 'राफेल प्रकरणात मोदी सरकार उघडे पडले व 'ठग्स ऑफ हिंदुस्थान' हा पडलेला सिनेमा दिल्लीत पुन्हा झळकला,' असं म्हणत शिवसेनेनं पंतप्रधान मोदींवर घणाघात केला आहे. राफेल प्रकरण सुप्रीम कोर्टात पोहोचल्यानंतर गेल्या काही दिवसांपासून गोंधळ सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेनं ही टीका केली आहे.

सुप्रीम कोर्टाने राफेल प्रकरणाबाबत आपला निर्णय दिल्यानंतरही या प्रकरणाबाबतचा वाद थांबताना दिसत नाही. कारण आता कोर्टात सादर केलेल्या शपथपत्रात 'टायपिंग मिस्टेक' असल्याचं केंद्र सरकारने म्हटलं आहे. यावरून सामनातून मोदी सरकारवर निशाणा साधण्यात आला आहे. बंद लिफाफ्यात सरकारने राफेल सौद्याबाबत जी माहिती न्यायालयासमोर आणली त्यावर अवलंबून राहून न्यायालयाने आपले मत मांडले (निकाल नाही), पण बंद लिफाफ्यातील माहिती 'अर्धसत्य' होती व न्यायालयाने काहीतरी चुकीचा अर्थ घेतला आहे असे आता मोदी सरकारला सांगावे लागले हे धक्कादायक आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे हसे झाले. मोदी सरकार उघडे पडले व 'ठग्स ऑफ हिंदुस्थान' हा पडलेला सिनेमा दिल्लीत पुन्हा झळकला.'चौकीदार चोर है' असे श्री. राहुल गांधी अलीकडे सांगत आहेत, पण चौकीदारांच्या मंडळींनी न्यायालयात शपथेवर खोटे सांगून 'राफेल' निर्णयात क्लीन चिट मिळविण्याचा प्रयोग केला व तो त्यांच्यावर उलटला.



## गोपीनाथ मुंडेंच्या विचारांचा खरा वारसदार मीच -धनंजय मुंडे

**नवी मुंबई (धनश्री सट्टा)-** गोपीनाथ मुंडे साहेबांच्या वारशाचा हक्कदार मी कधीच नाही. जे चालवत आहेत ते सक्षमपणे चालवत आहेत. भले मी त्यांच्या पोटी जन्म घेतला नसेल तरी २२वर्ष त्यांच्या संघर्षाच्या काळात मी त्यांच्या बरोबर होतो. त्यामुळे गोपीनाथ मुंडेच्या विचारांचा खरा वारसदार मीच असल्याचे वक्तव्य धनंजय मुंडेनी केले आहे.नेरुळ येथे गोपीनाथ मुंडे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विरोधीपक्षनेते धनंजय मुंडे आणि राष्ट्रवादीचे नेते गणेश नाईक उपस्थित होते. ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे यांनी गोपीनाथ मुंडे यांचे खरे वारसदार आपण असल्याचे सांगितल्यानंतर आता धनंजय मुंडे यांनीही याला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.मुंडे साहेबांची स्वप्न, इच्छा काय होती हे मला माहित आहे. त्याची जाणीव देखील मला आहे. साहेबांनी ज्या सर्वसामान्य जनतेसाठी संघर्ष केला. आज त्याच प्रश्नांसाठी विरोधी पक्ष नेता म्हणून मी संघर्ष करीत आहे. माझा पक्ष वेगळा असला, विचार धारा वेगळा असला तरी देखील गोपीनाथ मुंडे साहेबांचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम मी करत आहे. त्यांमुळेचं त्यांच्या विचारांचा वारसदार मीच असल्याचे धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले आहे.





## अपघातांचा विक्रम करणारी 'शिवशाही' थकली

**मुंबई (हर्षद परब)-** अवघ्या दीड वर्षापूर्वी सेवेत दाखल होऊन तब्बल २३० अपघात करणारी राज्य परिवहन मंडळाची (एसटी) अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त शिवशाही बस आता धापा टाकू लागली आहे. एसटीच्या ताफ्यातील किमान ५० ते ६० शिवशाही बसगाड्या गॅरेजमध्ये नियमितपणे 'ॲडमिट' असल्याचे चित्र आहे. या बसगाड्यांचे क्लच आणि गिअरबॉक्स यांत बिघाड होण्याचे प्रमाण मोठे असल्याचे सांगण्यात येते. शिवशाहीच्या अपघातांप्रमाणेच या तांत्रिक बिघाडांनाही अप्रशिक्षित चालक कारणीभूत असल्याची शंका एसटीच्या कर्मचाऱ्यांकडूनच व्यक्त केली जात आहे.एसटीच्या ६९ व्या वर्धापनदिनी १ जून २०१७ मध्ये पहिली शिवशाही दाखल झाली होती. त्यानंतर टप्प्याटप्प्याने ९७५ शिवशाही रस्त्यावर उतरवण्यात आल्या. त्यातील ४९५ एसटीच्या आणि ४८० खासगी मालकीच्या आहेत. सध्या एसटीच्या मालकीच्या ३४ शिवशाही बस आगारात दुरुस्तीसाठी उभ्या असल्याचे सांगण्यात येते. खासगी शिवशाही गाड्यांची अधिकृत माहिती उपलब्ध नाही, कारण या खासगी शिवशाहीवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणाच नाही. परंतु त्यांचीही संख्या तेवढीच असल्याचे एसटीच्या गोटातून सांगण्यात येते. शिवशाही सेवेत दाखल झाल्यापासूनचे १९ जीवघेणे अपघात, १९० गंभीर अपघात आणि २१ किरकोळ अपघात पाहता ही बसगाडी प्रवाशांचा कर्दनकाळ तर बनत चालली नाही ना, अशी चर्चा सुरू झाली.

या अपघातांना आळा घालण्यासाठी भाडेतत्त्वावरील नव्या शिवशाही बसगाड्यांवर एसटीचेच चालक नेमण्याचा निर्णयही महामंडळाने घेतला. मात्र योग्य प्रशिक्षण नसलेले चालक, तसेच त्यांच्यावरील अतिरिक्त कामाचा ताण हे शिवशाहीच्या अपघातांना ज्याप्रमाणे कारणीभूत असल्याची शक्यता वर्तविण्यात येते, त्याचप्रमाणे अशा चालकांमुळेच या बसगाडीत तांत्रिक बिघाड होत असावेत, अशी शक्यता एक अधिकाऱ्याने व्यक्त केली.

## घाबरल्यामुळे रुग्णांच्या चौथ्या मजल्यावरून उड्या; अनेकजण फ्रॅक्चर

**मुंबई (सुनिल सावंत)-** अंधेरीतील कामगार रुग्णालयात भीषण आग लागली असून बचावकार्यादरम्यान एकाचा मृत्यू झाला आहे. दुपारी चारच्या सुमारास ही आग लागली. आग लागल्याचे लक्षात आल्यानंतर चौथ्या मजल्यावरील रुग्णांमध्ये एकच घबराट पसरली. अनेक रुग्णांनी वाचण्यासाठी खिडक्यांच्या दिशेने धाव घेतली. अनेक रुग्ण खिडकीत बसून मदतीसाठी धावा करताना दिसत होते. काही रुग्णांनी चौथ्या मजल्यावरून उडी मारल्याने त्यांना फ्रॅक्चरही झाले आहे. यामध्ये एका रुग्णाचा मृत्यू झाला. यानंतर अग्निशमन दलाने स्नॉर्केल शिडी आणून रुग्णांना खाली उतरवायला सुरुवात केली आहे. हे बचावकार्य अजूनही सुरु असून आतापर्यंत जवळपास ४७ जणांना सुखरूपणे बाहेर काढण्यात आले आहे. ही आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप समोर आलेले नाही. मात्र, या आगीमुळे पुन्हा एकदा मुंबईच्या इमारतींमधील अग्निरोधक यंत्रणेच्या फोलपणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.अंधेरी मरोळ भागात तळ अधिक पाच मजल्यांचे कामगार रुग्णालय असून सायंकाळी चार वाजताच्या सुमारास रुग्णालयाच्या चौथ्या मजल्यावर आगीचा भडका उडाला.



## सौजन्य व्हॉट्सअप




## कमलनाथ मध्य प्रदेशचे १८ वे मुख्यमंत्री, शपथविधी समारंभाला विरोधकांची एकजूट

**भोपाल (हिंदुस्थान समाचार)-** मध्य प्रदेशचे १८ वे मुख्यमंत्री म्हणून कमलनाथ यांनी आज शपथ घेतली. भोपाळच्या जंबूरी मैदानावर झालेल्या भव्य कार्यक्रमात त्यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली. कार्यक्रमाला काँग्रेसाध्यक्ष राहुल गांधी, माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्यासह विरोधीपक्षाचे दिग्गज नेते उपस्थित होते. यात माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा, कर्नाटकचे मुख्यमत्री कुमारस्वामी, फारूख अब्दुल्ला, शरद यादव, एम. के स्टॅलीन यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.शपथविधी समारंभाच्या निमित्तानं काँग्रेसने विरोधीपक्षांची एकजूट घडवून आणल्याचं बोललं जातंय. या कार्यक्रमात राज्यातल्या साधू संतांनाही निमंत्रित करण्यात आलं होतं. माजी मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान हेही या कार्यक्रमाला उपस्थित होते.मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांची १० दिवसात सरसकट कर्जमाफी देणार, अशी घोषणा कमलनाथ यांनी केली होती. ती त्यांना पूर्ण करावी लागणार आहे. काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी निवडणूक प्रचारात मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचं आश्वासन दिलं होतं. निवडणूक विजयानंतर राहुल यांनी कर्जमाफीवर केलेल्या विधानावरून विरोधकांकडून त्यांना टार्गेट करण्यात आलं. निवडणूक जिंकल्यावर घेतलेल्या पत्रकार परिषदेत राहुल म्हणाले होते की, कर्जमाफी हे शेतीवरील शेवटचं उत्तर नाही. शेती प्रश्नावरील उत्तर खूप अवघड आहे. आम्ही ते शोधण्याचा प्रयत्न करू. आम्ही कर्जमाफीदेखील देऊ.'स्थानिक पातळीवर चालणारा प्रचंड भ्रष्टाचार, शेतकऱ्यांचे विविध प्रश्न, ग्राम पंचायत पातळीवर गोशाळा उभारणी हे प्रश्न मार्गी लावणं, हे आपल्या सरकारचे पहिले प्राधान्य असेल, असं कमलनाथ म्हणाले.

मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीत ११४ जागा मिळवलेली काँग्रेस बहुमतापासून अवघ्या दोन जागा दूर होतं. अशा स्थितीत बहुजन समाज पक्षाच्या अध्यक्षा मायावती यांनीही काँग्रेसला थेट पाठिंबा जाहीर केला होता. या निवडणुकीत ११४ जागा मिळवत काँग्रेस हाच सर्वात मोठा पक्ष ठरला.

### शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, कमलनाथ यांचा पहिल्याच दिवशी मोठा निर्णय



मध्य प्रदेशमध्ये काँग्रेस सरकार स्थापन झाल्यानंतर पहिल्याच दिवशी शेतकरी कर्जमाफीचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री कमलनाथ यांनी याबाबत घोषणा केली आहे. शेतकऱ्यांची कोणत्याही नियम आणि अटींशिवाय सरसकट कर्जमाफी करण्यात आली आहे. काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी निवडणूक प्रचारात मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचं आश्वासन दिलं होतं. निवडणूक विजयानंतर राहुल यांनी कर्जमाफीवर केलेल्या विधानावरून विरोधकांकडून त्यांना टार्गेट करण्यात आलं. पण अखेर काँग्रेसने कर्जमाफी करून विरोधकांना उत्तर दिलं आहे.

# दहिसर ते वांद्रे कांदळवन क्षेत्र होणार झोपडीमुक्त

**मुंबई (सम्यक कासारे)- दहिसर-वांद्रे परिसरातील १ हजार ४३५ हेक्टरवरील कांदळवनात ४२३ होत्या, त्यांपैकी आता अवघ्या ४५ झोपड्या उरल्या असून येत्या काही काळात त्या काढल्या की पश्चिम उपनगरातील कांदळवन झोपडीमुक्त होईल.**

पश्चिम मुंबईचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत देशमुख यांनी यासंदर्भात सांगितले की, चारकोप आणि मालवणी परिसरात डेब्रिजची समस्या मोठी होती. भूमाफियांकडून कांदळवन परिसरात डेब्रिज टाकून अनधिकृतरीत्या झोपड्या बांधल्या जातात. चारकोपमध्ये आठ ते दहा दिवसांपूर्वी एक डेब्रिज वाहन ताब्यात घेण्यात आले होते. तीन आरोपींना अटक झाली. एका डेब्रिज वाहनावर कारवाई सुरू आहे. मालवणीमध्ये ऑक्टोबरमध्ये डेब्रिजच्या पाच गाड्या पकडण्यात आल्या होत्या. मागील महिन्यात १६ आरोपींना पकडून एक मोठी कारवाई करण्यात आली. तसेच कांदळवन विभागात पार्किंग लॉट तयार करून व्यवसाय केला जात होता. पार्किंग गाड्या ताब्यात घेऊन त्यांच्यावर दंड आकारण्यात आला आहे. कांदळवन परिसरातील आतापर्यंत दोन पार्किंग लॉटवर कारवाई करण्यात आली आहे. कारवाईतून ५ लाख २८ हजार रुपये दंड वसूल करून शासनाकडे जमा करण्यात आला आहे. बोरीवली, कांदिवली, मालवणी, चिकूवाडी आणि मार्वे येथील अनधिकृत झोपड्यांवर तोड कारवाई करण्यात आली.



उर्वरित काही झोपड्यांवर जानेवारी महिन्यापर्यंत तोड कारवाई केली जाईल. दहिसर येथील गणपत पाटील नगर, गोरेगाव पहाडी परिसर, वर्सोवा येथे सरकारी किंवा खासगी जमिनीवर झोपड्या वसल्या आहेत. खासगी कांदळवन परिसरातील कडेकडेला झोपड्या वसलेल्या दिसून येतात. सर्व झोपड्या या ५० मीटरच्या क्षेत्रात तयार होत आहेत, असेही देशमुख यांनी सांगितले.

१ हजार ४३५ हेक्टर परिसरात अतिक्रमण झाले होते. ते कांदळवन अधिकाऱ्यांनी कारवाई करून हटविले; तसेच कुर्ला १ हजार ०४३.५२ हेक्टर, अंधेरी १०६.५९ हेक्टर आणि बोरीवली ६२४.७२ हेक्टर असा एकूण १ हजार ७७४.८४ हेक्टर खासगी जागा आहे. या जागेवरही कांदळवन निर्माण झाले आहे.

# शीव-पनवेल महामार्गावर आठ पदरी बोगदा

**मुंबई (विशाल कारंडे)-** नवी मुंबईतील अंतर्गत वाहतुकीमुळे शीव-पनवेल महामार्गावर होणारी कोंडी दूर करण्यासाठी तुर्भे ते खारघरदरम्यान सहा किमी लांबीचा बोगदा तयार करण्याची योजना राज्य सरकारने आखली आहे. या आठ पदरी बोगद्यामुळे महामार्गावरील वाहतूक सुसाट होणार असून वाहनांचे किमान दोन तास वाचण्याची चिन्हे आहेत. या बोगद्याची तांत्रिक आणि वित्तीय सुसाध्यता तपासण्यासाठी सल्लागार कंपनीची नियुक्तीही करण्यात आली आहे. शीव-पनवेल महामार्ग आणि ठाणे-बेलापूर रस्ता या दोन्ही मार्गावर सातत्याने वाहनांची वर्दळ असते. त्यातही अवजड वाहनांमुळे या रस्त्यावर गर्दीच्या वेळी वाहतूक विस्कळीत होण्याचे प्रकार वारंवार घडतात. पावसाळ्यात रस्त्यावरील खड्ड्यांमुळे या मार्गावर वाहनांचा वेग मंदावतो व वाहनांची मोठी रांग लागते. परिणामी मुंबईहून पुणे, कोकण, गोवा या दिशेने जाणाऱ्या वाहतुकीला मोठा फटका बसतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काही



दिवसांपूर्वी झालेल्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत या मार्गावरील वाहतूक कोंडीवर झालेल्या चर्चेनंतर पर्यायी व्यवस्थेचा शोध घेण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास दिले होते. त्यानुसार तुर्भे-खारघर दरम्यान पारसिक डोंगरातून आठ पदरी बोगदा बांधण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. सुमारे सहा किलोमीटर लांबीच्या आठपदरी बोगद्यामुळे वाहनांना सानपाडा, नेरुळ, बेलापूर या भागाला वळसा घालून थेट जाता येईल. त्यामुळे अंतर आणि वेळेची बचत होणार आहे. या बोगद्याची जबाबदारी सरकारने राज्य रस्ते विकास महामंडळावर सोपविली असून त्यासाठी आवश्यक तांत्रिक आणि वित्तीय मदत करण्याची जबाबदारी सिडको आणि औद्योगिक विकास महामंडळावर सोपविण्यात आल्याची माहिती मंत्रालयातील उच्चपदस्थ सूत्रांनी दिली.

# 'मोनो' कात टाकणार!



**मुंबई (प्रतिनिधी)-** शुभारंभापासूनच रडतरखडत सुरू असलेली भारतातील पहिली मोनोरेल वाहतूक यंत्रणा आता कात टाकणार आहे. गेल्या चार वर्षांपासून मोनोरेल चालवण्याची जबाबदारी असलेल्या मलेशियन कंपनी 'स्कोमी'ने कामात कसूर केल्याचा ठपका ठेवत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मोनोच्या चाव्या शुक्रवारपासून स्वत:कडे घेतल्या. आता मोनोच्या सध्याच्या दोन गाड्यांची दुरुस्ती करण्यासोबतच येत्या महिनाभरात आणखी दहा गाड्यांसाठी निविदा काढण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. तसेच येत्या तीन महिन्यांत मोनोरेलचा वडाळा ते सातरस्ता हा दुसरा टप्पाही कार्यान्वित केला जाणार आहे.

'स्कोमी' आणि 'एल अॅण्ड टी' यांनी संयुक्तपणे तयार केलेल्या 'एलटीएसई' कंपनीच्या गळ्यात मोनोची माळ टाकून 'एमएमआरडीए'ने फेब्रुवारी २०१४ मध्ये मोनोच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण केले. मात्र, सुरुवातीपासूनच या रेल्वेसेवेला प्रवाशांचा कमी प्रतिसाद मिळाला. त्यातच नोव्हेंबर २०१७ मध्ये म्हैसूर कॉलनी स्थानकात गाडीला लागलेल्या आगीनंतर जवळपास १० महिने मोनोसेवा पूर्णपणे बंद होती. या आगीमुळे २५ कोटींचे नुकसानही झाले. 'एमएमआरडीए'ने 'स्कोमी'ला आर्थिक बळ देऊन १ सप्टेंबरपासून मोनोची सेवा पुन्हा सुरू केली. यादरम्यान 'स्कोमी'चे कंत्राट संपल्यानंतर एमएमआरडीएने काढलेल्या निविदांना प्रतिसाद न मिळाल्याने मोनोरेलची जबाबदारी पुन्हा 'स्कोमी'कडेच देण्यात आली; परंतु वारंवार सूचना देऊनही 'स्कोमी'ने कंत्राटातील वायदे पूर्ण न केल्याने अखेर या कंपनीला बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला.

नव्या मोनो गाड्यांची पूर्तता, नादुरुस्त गाड्यांच्या यांत्रिक भागांचा पुरवठा, दुसरा टप्पा कार्यान्वित करण्याची निश्चिती अशा कंत्राटामधील अटी गेल्या वर्षभरात स्कोमीने पूर्ण केल्या नाहीत. शिवाय त्याबाबत कोणत्याही प्रकारची हालचाल केली नाही. त्यामुळे अखेरीस त्यांना प्रकल्पामधून हद्दपार करून शुक्रवारपासून संपूर्ण कारभार आम्ही स्वीकारल्याची माहिती 'एमएमआरडीए'चे महानगर आयुक्त आर.ए. राजीव यांनी दिली. तसेच व्यवस्थापनाच्या दृष्टीने विविध विभागांचे प्रमुख म्हणून प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्याचे त्यांनी सांगितले. सध्या 'प्रकल्प अंमलबजावणी युनिट'कडून (पीआययू) व्यवस्थापनाचे काम पाहिले जाणार आहे. त्यानंतर नव्याने स्थापन होणाऱ्या 'मुंबई मेट्रो संचालन महामंडळा'मध्ये मोनो प्रकल्पाचा समावेश करण्यात येणार असल्याचे राजीव म्हणाले.

# घरगल्ल्या तुंबविणाऱ्या ५०० कुटुंबांना पालिकेची नोटीस

**मुंबई (दिनेश वाजे)- गेले वर्षभर प्रबोधन करूनही दोन इमारतींमधील घरगल्ल्यांमध्ये कचरा टाकणाऱ्या दक्षिण मुंबईमधील तब्बल ५०० कुटुंबीयांवर पालिकेने नोटीस बजावली आहे. नोटीसला समाधानकारक उत्तर न देणाऱ्या कुटुंबांविरुद्ध न्यायालयात खटला दाखल करण्याची तयारी पालिकेने केली आहे. त्यामुळे या कुटुंबांचे धाबे दणाणले आहे.**

दक्षिण मुंबईमधील पालिकेच्या 'सी' विभाग कार्यालयाच्या हद्दीतील रहमान स्ट्रीट, मौलाना शौकत अली रोड, पाचवा कुंभारवाडा, नानुभाई देसाई रोड, सी. पी. टँक, व्ही. पी. रोड, बी. जे. रोड., ए. के. रोड, आनंदीलाल पोदार मार्ग या परिसरात मोठ्या संख्येने दाटीवाटीने इमारती उभ्या आहेत. दोन इमारतींमध्ये जेमतेम अर्धा ते एक फूट रुंद अशा एकूण १७१७ घरगल्ल्या आहेत. या इमारतींमधील रहिवासी या घरगल्ल्यांमध्ये सर्रास कचरा फेकत असून घरगल्ल्या कचऱ्याने तुडुंब भरल्या आहेत. घरात नको असलेला कचरा, उष्टे खरकटे घरगल्ल्यांमध्ये टाकण्यात येत असल्यामुळे या परिसरात उंदीर आणि घुशींचा सुळसुळाट झाला आहे. दाटीवाटीने उभ्या असलेल्या इमारतींदरम्यानच्या घरगल्ल्यांमधूनच गेलेल्या जलवाहिन्यांद्वारे रहिवाशांना पाणीपुरवठा होत आहे. न्हाणीघर, सांडपाण्याच्या फुटलेल्या वाहिन्यांमधून घरगल्ल्यांमध्ये गळती होत असून काही ठिकाणी सांडपाणी आणि कचरा यामुळे घरगल्ल्यांना बकाल रूप आले आहे. घरगल्ल्यांमधून गंजून रहिवाशांना दूषित पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव होत असून रहिवाशांच्या आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत. घरगल्ल्या स्वच्छ राहाव्यात यासाठी 'सी' विभाग कार्यालयाने २ ऑक्टोबर २०१७ पासून या परिसरात जनजागृती मोहीम हाती घेतली होती. घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घरोघरी जाऊन घरगल्ल्यांमध्ये कचरा टाकू नये, त्यामुळे होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृती केली. मात्र एक वर्ष लोटल्यानंतरही परिस्थितीत फारसा बदल आढळून आला नाही. त्यामुळे आता 'सी' विभाग कार्यालयाने धोबीतलाव, भुलेश्वर, घोगारी मोहल्ला, खारा टँक, कुंभारवाडा या भागातील घरगल्ल्यांमध्ये कचरा टाकणाऱ्या तब्बल ५०० कुटुंबांवर नोटीस बजावली आहे. कचरा करणाऱ्यांवर प्रति दिन एक



हजार रुपये दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद पालिकेच्या नियमात आहे. मात्र दंडाची आकारणी करणाऱ्या पालिका कर्मचाऱ्यांशी रहिवासी हुज्जत घालत असून वेळप्रसंगी प्रकरण हातघाईवर आल्यानंतर पोलिसांना पाचारण करण्याची वेळ कर्मचाऱ्यांवर येत आहे. ही बाब लक्षात घेऊन घरगल्ल्यांमध्ये कचरा टाकणाऱ्यांवर नोटीस बजावण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती पालिका अधिकाऱ्याने दिली. काही भागात सकाळी १० ते ११ च्या दरम्यान कचरा गोळा करण्यासाठी घंटागाडी फिरत असते. मात्र रहिवासी घंटागाडीमध्ये कचरा टाकण्याऐवजी घरगल्ल्यांमध्ये टाकत आहेत. तसेच काही दुकानदारही रस्त्यावरच कचरा टाकत असून त्यांच्यावरही नोटीस बजावून न्यायालयात खटला दाखल करण्यात येणार असल्याचे या अधिकाऱ्याने सांगितले.

# दांडी मारणाऱ्या नगरसेवकांना चाप; बायोमेट्रिकचे बंधन

**मुंबई (केदार माहिमकर)-** पालिका कर्मचाऱ्यांप्रमाणे नगरसेवकांचीही बायोमेट्रिक हजेरी घेतली जाणार आहे. सभागृहाबाहेरील यंत्रावर आपला ठसा उमटवल्यानंतरच सर्वपक्षीय नगरसेवकांना सभागृहाचे द्वार उघडणार आहे. त्यामुळे दांडीबहाद्दर नगरसेवकांची नोंद तत्काळ होणार आहे. मुंबई महापालिकेत २२७ नगरसेवक निवडून आले आहेत. जनतेचे प्रतिनिधी असल्याने त्यांचे प्रश्न नगरसेवकांना पालिका महासभेत मांडता येतात. अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न हाताळून प्रशासनाला धारेवर धरण्याची ताकद नगरसेवकांना या सभागृहानेच मिळवून दिली आहे. दर महिन्याला होणाऱ्या या बैठकांना हजेरी लावण्यासाठी नगरसेवकांना भत्ताही मिळतो. मात्र बरेच नगरसेवक महासभेला दांडी मारतात. तर, बहुतांश नगरसेवक सभागृहात येण्याआधी मस्टरवर सही करून पळ काढतात. सर्वच पक्षांत असे



दांडीबहाद्दर नगरसेवक असल्याने त्यांना चाप बसावा, अशी गटनेत्यांची इच्छा होती. त्यामुळे नगरसेवकांच्या बायोमेट्रिक हजेरीच्या प्रस्तावाला सर्वपक्षीय गटनेत्यांच्या बैठकीत मंजुरी मिळाली होती. या प्रस्तावाला गुरुवारी पालिका महासभेतही मंजुरी मिळाली. नगरसेवकाला प्रत्येक महासभेला हजेरी लावण्यासाठी दीडशे रुपये मिळतात. एका महासभेवर १० ते १५ हजार रुपये खर्च करण्यात येतो. तरीही अनेक नगरसेवक महासभेला दांडी मारतात. तर, बहुतांश नगरसेवक सभागृहात येण्याआधी मस्टरवर सही करून पळ काढत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळेच आता त्यांना चाप बसवण्यासाठी सभागृहात प्रवेश करण्यापूर्वी व बाहेर जाताना बायोमेट्रिक हजेरी नगरसेवकांना बंधनकारक करण्यात आली आहे.

## मिनी ट्रेनच्या वातानुकूलित डब्यामुळे ३० हजारांची कमाई

**मुंबई (प्रतिनिधी)-** माथेरानच्या मिनी ट्रेनला एक वातानुकूलित डबा जोडण्यात आला असून त्याला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. गेल्या तीन दिवसांत या ट्रेनद्वारे मध्य रेल्वेने ३० हजार रुपयांची कमाई केली आहे. नेरळ-माथेरान-नेरळ मार्गावर धावणाऱ्या मिनी ट्रेनला ८ डिसेंबरपासून एक वातानुकूलित डबा जोडण्यात आला आहे. १६ प्रवासी क्षमता असलेल्या या डब्यातून प्रवासासाठी प्रत्येकी ४१५ रुपये शुल्क आकारले जाते.


महाराष्ट्र शासन
[illegible]
[illegible]
अंधेरी, मुंबई
[illegible]

[illegible]

डीजीआयपीआर/ २०१८-२०१९/४९७६


# पदोन्नतीसाठी मराठा क्रांती ठोक मोर्चाचा आंदोलनाचा इशारा

**मुंबई (विजय पंचवाघ)-** पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण होऊनही, ५८६ पोलीस तरुणांना पदोन्नतीपासून डावलले. पुढील दोन दिवसांत ५८६ त्यांना पदोन्नतीचा आदेश मिळाला नाही, तर मराठा क्रांती मोर्चातर्फे १८ डिसेंबरला आंदोलन केले जाईल, अशी भूमिका मराठा क्रांती ठोक मोर्चाचे समन्वयक आबासाहेब पाटील यांनी मांडली. पाटील म्हणाले, ५८६ तरुणांना पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय पदोन्नती परीक्षेत २३० पेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत. पदोन्नती परीक्षा पास होऊन एक वर्षे उलटून गेले, तरीही त्यांना पदोन्नती देण्यात आली नाही.



हे पोलीस तरुण १२ ते १४ तास आपली कर्तव्ये पार पाडत असतात. त्यांच्यावर सातत्याने अन्याय होत आहे. या संदर्भात निर्णय घेण्यात आला नाही, तर मराठा क्रांती ठोक मोर्चा आंदोलन करेल. पोलीस तरुणांवर सातत्याने अन्याय होत आहे. तसेच, महसूल विभागातील अप्पर जिल्हाधिकारी पदोन्नतीबाबत अशीच स्थिती आहे. राज्यातील अप्पर जिल्हाधिकारी संवर्गात सद्यस्थितीत ३४ पदे रिक्त आहेत. राज्यामध्ये ७२ उपजिल्हाधिकारी कार्यरत असताना, त्यांना रिक्त पदावर पदोन्नती दिली जात नाही. याबाबत मुख्यमंत्री, महसूलमंत्र्यांना अनेकदा निवेदन देऊनही सकारात्मक भूमिका घेतली नसल्याचे पाटील म्हणाले.

# ...तरीही झिकाचा पॉझिटिव्ह रुग्ण आढळलाच नाही!

**मुंबई (दिनकर यादव)-** राज्याच्या बाहेरून आलेल्या 'झिका' व्हायरसने राज्यात वर्षभर दहशत पसरविली. यानंतर पालिका प्रशासनासह सार्वजनिक आरोग्य विभागही झिकाच्या प्रतिबंधासाठी सज्ज झाला. परिणामी, गेल्या १० महिन्यांत झिका व्हायरसचे १ हजार ४६३ नमुने पुण्यातील राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेत तपासणीसाठी पाठविले. यात राज्यातील ४९८ नमुन्यांचा समावेश होता, मात्र इतके नमुने तपासूनही झिकाचा एकही पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आला नसल्याची माहिती राज्य साथरोग नियंत्रण शाखेने दिली आहे. बाहेरून राज्यात पसरलेल्या झिका व्हायरसने सामान्यांच्या मनात भीती निर्माण केली होती.


महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
[illegible]
[illegible]
ई निविदा सूचना [illegible] २०१८-१९
[illegible] http://mahatenders.gov.in [illegible]

| Sr No | Name Of Work | Amount |
|---|---|---|
| 1 | Est no [illegible] of 201[illegible] Providing and Fixing of Automatic Bollard System [illegible] at A.T.S. Office, Nagpada, Mumbai (2 nd call) | Rs. 47[illegible]/- |
| २ | Est no. 1404 of 2018-19 - sub Work - 2 - Providing, installing, testing and commissioning of digital sound system with Video Projection & Presentation System in the auditorium at new Administrative Building at sir j Hospital, Byculla Mumbai (2 nd call) | Rs. 19[illegible]/- |

[illegible]
१. http://mahatenders.gov.in
[illegible]

दिनांक : [illegible]
कार्यकारी अभियंता
[illegible]

डीजीआयपीआर/ २०१८-२०१९/४९८३


# 'काँग्रेस हाच भाजपला पर्याय' - शरद पवार

**मुंबई (विश्वनाथ कारवी)-** पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपबद्दलची नाराजी मतदारांनी स्पष्टपणे व्यक्त केली आहे. भाजपला पर्याय म्हणून काँग्रेस उभा ठाकला आहे. त्यामुळे सार्वत्रिक निवडणुकांनंतर राजकीय चित्र बदलेल, असे भाकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी बुधवारी येथे केले. काँग्रेसने नवीन पिढीकडे नेतृत्व सोपवले. ते लोकांनी मान्य केले आहे. सार्वत्रिक निवडणुकीत तिसरी आघाडी किंवा यूपीए ३ असे काही नसेल. मात्र देशपातळीवरील प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आपापसातील मतभेद विसरून सर्वांनी एकत्र आले पाहिजे, अशी



अपेक्षाही पवार यांनी व्यक्त केली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात पवार यांनी कार्यकर्ते, नेते, विविध क्षेत्रांतील मान्यवर यांच्या उपस्थितीत साधेपणाने आपला ७८ वा वाढदिवस साजरा केला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष अशोक चव्हाण, माणिकराव ठाकरे यांच्यासह अनेक नेत्यांनी पवार यांची भेट घेऊन अभिष्टचिंतन केले. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालांविषयी पवार म्हणाले की, मतदारांनी स्पष्ट नाराजी व्यक्त केल्याचे दिसते. मतदारांचा कौल पाहता भाजप सोडून इतर पक्षांमध्ये समाधान आहे. भाजपला काँग्रेस हा महत्त्वाचा पर्याय आहे. ज्या-ज्या वेळी निवडणुका होतील त्या वेळी मतदार चित्र बदलतील. सर्वोच्च न्यायालयाच्या चार न्यायाधीशांनी पत्रकार परिषद घेतली, रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नररांनी राजीनामा दिला, सीबीआयमधील वाद चव्हाट्यावर आला. दिलेली आश्वासने पंतप्रधान या निवडणुकीत विसरले आणि फक्त एका कुटुंबाबद्दल बोलत राहिले. ज्यांनी पंडित नेहरू, इंदिरा गांधी यांना पाहिले नाही, तरीही ते एका कुटुंबावर हल्ला करत राहिले. त्याचा परिणाम निवडणूक निकालातून दिसला, असे पवार म्हणाले.

# नाकात सलाईनची ड्रिप, मुख्यमंत्री पर्रिकरांकडून कामांची पाहणी

**पणजी (वैभव पवार)- गोवा राज्य सरकारचं काम ठप्प झालं असून प्रशासन ढिम्म झाल्याची टीका विरोधक करत असतानाच मुख्यमंत्री मनोहर पर्रिकर यांनी विरोधकांना आपल्या कृतीतून उत्तर दिलंय. आजारी असूनही पर्रिकर आज बाहेर पडले आणि त्यांनी पणजीतल्या तिसऱ्या मांडवी पुलाच्या कामाची पाहणी केली.आजारी असल्याने गेल्या अनेक दिवसांपासून विश्रांती घेणाऱ्या मनोहर पर्रिकरांचा एक फोटो सोशल मीडियावर वायरल झाला आहे.**

या फोटोत मनोहर पर्रिकर नाकात ड्रिप असतानाही पुलांची पाहणी करताना दिसत आहेत. रविवारी त्यांनी जुआरी ब्रिज आणि तिसऱ्या मांडवी ब्रिजचे निरीक्षण केले.यावरुन भाजप नेत्यांककडून हे समर्पण आणि वचनबद्धतेचं एक उत्तम उदाहरण आहे, अशा शब्दात कौतुक केलं जात आहे तर विरोधकांना मात्र भाजप अशा अवस्थेतही पर्रिकरांना काम करण्याची जबरदस्ती करत असून हे अत्यंत अमानवीय आहे, अशी टीका विरोधकांनी केली आहे. मुख्यमंत्री मनोहर पर्रिकर १४ ऑक्टोबरला नवी दिल्लीमधील एम्स रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. यानंतर पहिल्यांदाच ते समोर आले. ६३ वर्षीय पर्रिकरांनी रविवारी मंडोरी आणि जुआरी पुलाचं काम पाहिलं. कित्येक महिन्याच्या कालावधीनंतर पर्रिकर



मांडवी येथील पुलाची पाहणी करताना दिसून आले. त्यावेळी त्यांच्या नाकात ड्रिप असल्याचे दिसून आले. मनोहर पर्रिकरांच्या अनुपस्थितीमुळे गोवा सरकार आणि प्रशासनाचं संपूर्ण काम ठप्प झालं असल्याची टीका वारंवार काँग्रेसकडून केली जात आहे. विरोधी पक्ष काँग्रेस आणि स्वयंसेवी संघटनांनी मुख्यमंत्री आजारी असल्याने प्रशासन ठप्प झाले असून त्यांनी विश्रांती घेऊन दुसऱ्याकडे मुख्यमंत्रीपद सोपवावे अशी मागणी केली होती. सगळ्या विरोधकांनी एकत्र येऊन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यावेळी मुख्यमंत्र्यांच्या दोनापावल येथील खाजगी निवासस्थानावर मोर्चा देखील काढला होता.दरम्यानच्या काळात मुख्यमंत्री फक्त फोटोमधून जनतेला दर्शन देत होते. सभापती प्रमोद सावंत यांच्याशी झालेल्या भेटी बरोबरच गुंतवणूक प्रोत्साहन मंडळ बैठक आणि मंत्रीमंडळ बैठकीचे फोटो मुख्यमंत्री कार्यालयाने प्रसिद्ध केले होते. काल बऱ्याच दिवसांनी मुख्यमंत्र्यांचा केंद्रीय मनुष्यबळ मंत्री प्रकाश जावडेकर यांच्यासोबत नवा फोटो सीएमओने प्रसिद्ध केला होता. पहिल्या ३ फोटोंमध्ये मुख्यमंत्री सोफ्यावर बसलेले तर कालच्या फोटोत ते उभे राहून एनआयटी गोवाच्या कायमस्वरूपी संकुलाच्या पायभरणी शिलेचे अनावरण करताना दिसत आहेत. मुख्यमंत्री आजारी असल्याने घराबाहेर पडू शकत नसल्याने कार्यक्रम त्यांच्या दोनापावल येथील खाजगी निवासस्थानी करण्यात आला होता.काँग्रेस प्रदेशाध्यक्ष गिरीश चोडणकर यांनी पत्रकार परिषद घेऊन मुख्यमंत्री पर्रिकर यांच्या आजारपणामुळे सरकार ठप्प झाल्याचा आरोप केला होता. त्यानंतर अवघ्या काही तासांच्या आत मुख्यमंत्री पर्रिकर यांनी घराबाहेर पडून पणजी येथील तिसऱ्या मांडवी पुलाच्या कामाची पाहणी करून विरोधकांची तोंडे बंद केल्याचे मानले जात आहे.दुपारी ३ च्या सुमारास मुख्यमंत्री आपल्या कारने घराबाहेर पडले. त्यांनी पर्वरीच्या बाजूने येत मेरशीपर्यंत पुलाच्या कामाची पाहणी केली.

# मास्टरकार्डधारक सावधान! आता तुमच्या व्यवहारांचा डेटा कुठे साठवणार माहितीये?

**नवी दिल्ली (पीटीआय)-** भारतीयांनी डेबिट किंवा क्रेडिट कार्डच्या माध्यमातून केलेल्या आर्थिक व्यवहारांची माहिती देशात असलेल्या सर्व्हरवरच ठेवण्याचे निर्देश ऑक्टोबरमध्ये रिझर्व्ह बँकेने दिले होते. त्यामुळे मास्टरकार्ड लवकरच जगातील इतर देशांतील सर्व्हरवरून भारतीयांच्या आर्थिक व्यवहारांची माहिती काढून टाकणार आहे. पण त्यामुळे आर्थिक व्यवहारांची सुरक्षितता धोक्यात येऊ शकते, असे मास्टरकार्डने म्हटले आहे. तरीही रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांमुळे आम्ही माहिती काढून टाकणार आहोत, असेही मास्टरकार्डने स्पष्ट केले.मास्टरकार्डचे भारतातील अध्यक्ष पोरूष सिंग म्हणाले, मास्टरकार्ड जगातील २०० देशांत काम करते. पण आतापर्यंत केवळ भारतानेच अशा पद्धतीने जगातील सव्हरवरून भारतीयांच्या आर्थिक व्यवहारांची माहिती काढून टाकण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे या निर्देशांचे पालन आम्हाला करावेच लागणार आहे. आता भारतीयांच्या आर्थिक व्यवहारांची माहिती कंपनीच्या पुण्यातील टेक्नोलॉजी सेंटरमध्ये साठवण्यात येईल. एका ठरावीक तारखेपासूनच भारतीयांच्या आर्थिक व्यवहारांची सर्व





माहिती काढून टाकण्यास आम्ही तयार आहोत. पण यांचे काही गंभीर परिणाम होऊ शकतात. काही व्यवहारांवरून वादही निर्माण होऊ शकतात. तरीही आम्ही डेबिट, क्रेडिट कार्डच्या सर्व व्यवहारांची माहिती काढून टाकू. त्यानंतर सर्व माहिती केवळ देशातील सर्व्हरवरच साठविण्यात येईल, असे सिंग यांनी रिझर्व्ह बँकेला सांगितले आहे. पण असे केल्याने आर्थिक व्यवहारांची सुरक्षितता पुढील काही काळासाठी कमकुवत होऊ शकते, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. आम्ही रिझर्व्ह बँकेला यासंदर्भातील वेळापत्रक दिले आहे. त्याप्रमाणे सर्व काही करण्याचे आम्ही ठरवले आहे, असेही ते म्हणाले. जगातील सर्व्हरवरून माहिती काढून टाकणे वाटते तितके सोप्पे नाही. केवळ एक बटण दाबून ही प्रक्रिया होणार नाही. ही प्रक्रिया गुंतागुंतीची आणि किचकट आहे. अनेक भागीदार त्यात सहभागी आहेत. जर कोणती चूक झाली, तर ते तुमच्यावर कायदेशीर कारवाई करू शकतात. त्यामुळेच आम्ही रिझर्व्ह बँकेला एक सविस्तर प्रस्ताव पाठवला आहे. त्यांच्या उत्तराची वाट पाहात आहोत.

# राफेल प्रकरण : भाजप देशभरात ७० पत्रकार परिषदा घेणार

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)-** राफेल विमान खरेदी प्रकरणी काँग्रेसने भाजपला घेरलेले असताना सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेपास नकार दिल्यानंतर भाजपला बळ मिळाले आहे. काँग्रेसला प्रत्युत्तर देण्यासाठी आणि राफेल प्रकरणी म्हणणं मांडण्यासाठी भाजप देशभरात ७० पत्रकार परिषदा घेणार आहे. राफेल विमान खरेदी प्रकरणात काँग्रेसने कोंडी केलेल्या भाजपला सर्वोच्च न्यायालयात मोठा दिलासा मिळाला आहे. त्यानंतर काँग्रेसविरोधात भाजपनेही काँग्रेसविरोधात आक्रमक धोरण स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे.दुसरीकडे संसदेच्या दुसऱ्या आठवड्याच्या कामकाजाला आजपासून



सुरुवात होणार आहे. आज संसदेत राफेलच्या मुद्द्यावरुन गोंधळ होण्याची शक्यता आहे. तसेच सरकार सुधारित तिहेरी तलाक विधेयक लोकसभेत मांडणार असण्याची शक्यता आहे.देशभर गाजत असलेल्या राफेल विमानांच्या करारावर मौन बाळगून असलेल्या पंतप्रधान मोदींनीही मौन सोडलं आहे. रायबरेलीत बोलताना मोदींनी राफेल करारावरुन काँग्रेसवर टीकास्त्र सोडलं. खोटेपणा हाच काँग्रेसच्या राजकारणाचा पाया राहिला आहे. आधी संरक्षण मंत्रालयावर अविश्वास दाखवणाऱ्या काँग्रेसचा आता देशाच्या सर्वोच्च न्यायालयावरही विश्वास राहिलेला नाही, असं मोदी म्हणाले.फ्रान्ससोबतच्या राफेल विमानांच्या करारात मोदी सरकारनं भ्रष्टाचार केल्याचा काँग्रेसचा आरोप आहे.

# शीख दंगली प्रकरणी काँग्रेस नेते सज्जन कुमार यांना जन्मठेप

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)-** १९८४ मधील शीख दंगली प्रकरणी दिल्लीतील हायकोर्टाने काँग्रेस नेते सज्जन कुमार यांना दोषी ठरवले आहे. १९८४ च्या शीखविरोधी दंगलीत हत्या आणि दंगलीचे गुन्हे दाखल असलेल्या काँग्रेस नेते सज्जन कुमार यांना कनिष्ठ न्यायालयाने दोषमुक्त केले होते. या सुटकेला दिल्ली हायकोर्टात आव्हान देण्यात आले होते. या खटल्यात आज हायकोर्टाने निर्णय दिला. हायकोर्टाने सज्जन कुमार यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर दिल्लीमध्ये मोठ्या प्रमाणात शीखविरोधी दंगल भडकली होती. दंगलीत ३ हजारपेक्षा अधिक शीख नागरिकांची हत्या करण्यात आली होती. काँग्रेस नेत्यांच्या चिथावणीमुळेच ही दंगल भडकली, असा आरोप आहे. सज्जन कुमार यांच्यावर दंगल भडकविल्याचा आरोप आहे. सज्जन कुमार हे तीन



वेळा खासदार राहिलेले आहेत. सज्जन कुमार यांना ३१ डिसेंबर २०१८ पूर्वी शरण येण्याचे आदेशही उच्च न्यायालयाकडून देण्यात आले आहेत.सज्जन कुमारसह कॅप्टन भागमल, गिरीधारी लाल आणि काँग्रेसचा माजी नगरसेवक बलवान खोखार या तिघांनाही जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तर किशन खोखार आणि महेंद्र यादव या दोघांना १० वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली.शीखविरोधी दंगलीप्रकरणी आता अखेर ३४ वर्षांनंतर शिक्षा सुनावण्यात आली आहे. षडयंत्र रचने, हिंसा घडवून आणणे आणि दंगली भडकवण्याप्रकरणी न्यायालयाने त्यांना दोषी ठरवले आहे असून तब्बल ३४ वर्षांनंतर सज्जन कुमार यांना शिक्षा ठोठावण्यात आली. याप्रकरणात इतरही काही काँग्रेस नेत्यांवर आरोप आहेत. मध्य प्रदेशचे आगामी मुख्यमंत्री कमलनाथ यांच्यावरही या प्रकरणात आरोप करण्यात आले आहेत.

# ‘मंटो’ मुद्द्यावर भारताला पाकिस्तानची मदत?

**मुंबई (अमोल गुडेकर)-** भारत आणि पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांमध्ये असणाऱ्या संबंधांविषयी काही वेगळं सांगण्याची गरज नाही. राजकारण, कला आणि क्रीडा अशा विविध मार्गांनी या दोन्ही राष्ट्रांमधील नातं सुधारण्याचा जितका प्रयत्न केला जातो, परिस्थिती मात्र नेहमीच या प्रयत्नांना अपयशात रुपांतरित करते. हे चित्र काही नवं नाही. पण, तरीही पुन्हा एकदा भारत- पाकिस्तानमधील संबंध सुधारण्यासाठी एक सकारात्मक पाऊल उचललं गेल्याचं कळत आहे. कलेच्या माध्यमातून अनेक गोष्टींमधील दुरावा जवळ येतो, त्याचंच उदाहरण सध्याही पाहायला मिळत आहे. नंदिता दास दिग्दर्शित 'मंटो या चित्रपटावरही पाकिस्तानमध्ये बंदी घालण्यात आली आहे. पण, ही बंदी उठवण्याचा आपण प्रयत्न करु असं आश्वासन पाकिस्तानचे मंत्री फवाद चौधरी यांनी दिलं आहे. खुद्द नंदितानेच तिच्या ट्विटर अकाऊंटवरुन त्यांचे आभार मानले आहेत. आयातकारांनी हा चित्रपट पाकिस्तानात आणावा असे मी प्रयत्न करत आहे. कोणीतरी यासाठी नक्कीच पाऊल उचलेल आणि व्यावसायिकीकरणाकडे कमी कल असणारा चित्रपट प्रेक्षकांपर्यंत आणण्याचा धोका पत्करेल अशी मी आशा करतो, असं फवाद म्हणाले होते. ज्यानंतर त्यांच्या या प्रयत्नांसाठी नंदिताने त्यांचे आभार मानले.फाळणीनंतर पाकिस्तानात गेलेल्या सआदत हसन मंटो या महान आणि तितक्याच वादग्रस्त लेखकाच्या आयुष्यावर आधारित चित्रपटाच्या प्रदर्शनावर पाकिस्तानात बंदी घालण्यात



आली होती. याविषयीच नंदिताने ट्विटरच्या माध्यमातून नाराजी व्यक्त केल्याचं पाहायला मिळालं. किंबहुना नंदिताने पाकिस्तानातील काही लेखक, कलाकार आणि चित्रपटासाठी लढणाऱ्या आंदोलकांचे आभार मानत नंदिताने एक पत्रही सोशल मीडियावर शेअर केलं. तिने शेअर केलेल्या या पत्रामध्ये पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान यांच्याकडे चित्रपटावरील बंदी उठवण्याची मागणीही करण्यात आली होती. यंदाच्याच वर्षी ऑक्टोबर महिन्यात पाकिस्तान चित्रपट प्रोड्युसर्स असोसिएशन (पीएफपीए)ने भारतीय चित्रपटांच्या प्रदर्शनावर पूर्णपणे बंदी घातली होती. भारतात एकही पाकिस्तानी चित्रपट दाखवला जात नाही, मग पाकिस्तानाच भारतीय चित्रपटाचं प्रदर्शन का करावं? असा प्रश्न 'पीएफपीए'चे वरिष्ठ अधिकारी चौधरी एजाज कामरान यांनी उपस्थित केला होता.

# बहिणीशी बोलत असल्याचा राग, सख्या भावांनी केली १४ वर्षांच्या मुलाची हत्या

**बीड (सुनील आढाव)-** आष्टीमध्ये दोन सख्या भावांनी त्यांच्याच गावातील १४ वर्षांच्या मुलाची हत्या केली आहे. केरूळ गावात घडलेल्या या प्रकाराने एकच खळबळ उडाली आहे. हत्या करणाऱ्या दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.आपल्या बहिणीला गावातील सातवीत



शिकत असलेला मुलगा बोलत असल्याचा राग मनात धरून सख्या भावांनी त्या मुलाची हत्या केली. पोलिसांनी याप्रकरणी अर्जुन लक्ष्मण गर्जे (वय१८) आणि दीपक गर्जे (वय १७) या दोन आरोपींना अटक केली आहे.धक्कादायक म्हणजे या आरोपींनी हत्या केल्यानंतर यातून वाचण्यासाठी एक बनावही रचला. संबंधित मुलाची खंडणीसाठी हत्या केली गेली आहे, अशा अफवा पसरवण्यात आल्या. पण पोलीस चौकशीनंतर हा सर्व प्रकार उघडकीस आला आहे.



# दिलीप कुमारांचा बंगला हडपण्यासाठी धमकी, सायरा बानोंचं मोदींना ट्विट

**मुंबई (विशाल कारंडे)-** दिग्गज अभिनेते दिलीप कुमार यांच्या पत्नी अभिनेत्री सायरा बानो यांनी पंतप्रधान मोदी यांना ट्विट करत मदत मागितली आहे. भू-माफिया समीर भोजवानी हा कारागृहातून बाहेर आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासन दिल्यानंतरही काही कारवाई झाली नाही, असं ट्विट सायरा बानो यांनी मोदींना अभिनेते दिलीप कुमार यांच्या ट्विटर अकाऊंटवरुन केलं आहे. समीर भोजवानीला पोलिसांनी एप्रिलमध्ये अटक केली होती. दिलीप कुमार यांचा वांद्र्यातल्या पाली हिल परिसरातील बंगला हडपण्यासाठी धमकी देण्यात येत असल्याची तक्रार सायरा बानो यांनी केली होती. या बंगल्यातील काही जागेची खोटी कागदपत्रे तयार करून समीर भोजवानी ही जागा बळकाविण्यासाठी धमकावत असल्याची तक्रार सायरा बानो यांनी केली होती.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या तक्रारीची दखल घेतली होती. त्यानंतर भोजवानी याच्या विरोधात खार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी त्याला अटक केली होती. भोजवानी सध्या तुरुंगातून बाहेर आला आहे. याचा दाखला देत सायरा बानो यांनी दिलीपकुमार यांच्या ट्विटर हॅण्डलवरून मोदींना या प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती केली आहे.'मी सायरा बानो खान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कळवू इच्छिते की, भूमाफिया समीर भोजवानी हा तुरुंगातून बाहेर आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आश्वासनानंतरही काहीच कारवाई करण्यात आलेली नाही. पद्म पुरस्कार विजेत्याला धनाचा आणि बळाचा वापर करून धमकाविले जात आहे. आपल्याकडे मुंबईत भेटीसाठी विनंती करीत आहे', असे सायरा बानो यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.

# ‘जीत’ प्रकल्पातून क्षयरोगमुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट; राज्यातील १३ शहरांचा समावेश

**मुंबई (प्रतिनिधी)-** ‘जीत’ प्रकल्पाच्या माध्यमातून क्षयरोगमुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जास्तीत जास्त क्षयरुग्णांना वेळेवर व संपूर्ण उपचार घेण्यास प्रवृत्त करण्यात येत आहे. या उपक्रमात खासगी रुग्णालये तसेच शासकीय आरोग्य संस्थाची भूमिका महत्वाची आहे. राज्यातील १३ शहरांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात येणार असल्याचे, आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत यांनी आज येथे सांगितले. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या ठराष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमठ अंतर्गत ‘जीत’ प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळ्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते ठरिवाईज्ड नॅशनल ट्युबर्क्युलोसिस कंट्रोल प्रोग्रॅमठ या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

आरोग्यमंत्री यावेळी म्हणाले, मुंबईत दररोज लाखो लोक रेल्वे, बस या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतून प्रवास करतात. त्यामुळे संसर्गजन्य



रोग पसरण्याची शक्यता जास्त असते. क्षयरोग झालेले किती रुग्ण संपूर्ण उपचार घेतात? हा मोठा प्रश्न समोर उभा राहतो. क्षयरोगावर संपूर्ण व नियमित उपचार घेतला तर तो बरा होऊ शकतो. आरोग्य विभाग यासाठी अनेक उपक्रम राबवत आहे. यासंदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून असे आढळून आले की, बहुतांश क्षयरुग्ण संपूर्ण उपचार घेत नाहीत. त्यामुळे संसर्ग वाढतो व परिणामी रुग्ण दगावण्याची शक्यता असते. क्षयरोग झालेल्या रुग्णांची संपूर्ण माहिती तसेच त्यांनी घेतलेले उपचार यावर संनियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. ‘जीत’ प्रकल्पाच्या माध्यमातून जास्तीत जास्त रुग्णांना उपचार घेण्यासाठी प्रवृत्त करता येईल. क्षयरुग्णांविषयी संपूर्ण माहिती उपलब्ध झाल्यामुळे त्यांना योग्य उपचाराखाली आणणे सोयीस्कर होईल. अशा प्रकारे क्षयरोगमुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट्य साध्य होईल, असा विश्वास आरोग्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त

# चौकीदार ही चोर है, राहुल गांधीचा पुनरुच्चार

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)-** राफेलप्रकरणी सुप्रीम कोर्टाने आज पंतप्रधान मोदींना दिलासा देत या प्रकरणात हस्तक्षेप करण्याची गरज नसल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर भाजपाध्यक्ष अमित शाह यांनी राफेल प्रकरणावरुन प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या राहुल गांधींवर टीका केली. त्याला राहुल गांधींनी थेट पत्रकार परिषदेत उत्तर दिले. राहुल गांधी यांनी राफेल प्रकरणावरुन पुन्हा एकदा भाजपला लक्ष्य केले. तसेच ‘चौकीदारही चोर है’, असे म्हणत पंतप्रधानांवर टीका केली. काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या मित्राकरवी चोरी केली आहे. राहुल गांधी म्हणाले की, वित्रमंत्री अरुण जेटली राफेलबाबत सुरुवातीला म्हणाले होते की, त्यांना राफेलची कोणतीही माहिती नाही. काही दिवसांनंतर जेटली म्हणाले की, राफेल डील एक सिक्रेट आहे, याबाबत कोणतीही माहिती देता येणार नाही.



राहुल यांनी मोदींवर भारतीय तरुणांचे रोजगार हिरावण्याचा आरोप केला आहे. ते म्हणाले की, ‘राफेल जर भारतात तयार केले असते, तर भारतात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती झाली असती. परंतु त्यांनी फ्रान्सच्या राष्ट्रपतींना राफेल फ्रान्समध्ये तयार करण्यास सांगितले.

# मोबाईल नंबर पोर्ट करणे झालं आणखी सोपं

**मुंबई (महेश वारणकर)-** मोबाईल नेटवर्कमुळे त्रस्त असाल तर नंबर पोर्ट करायला हरकत नाही. कारण नंबर पोर्ट करण्याची कटकटीची प्रक्रिया आता झटपट होणार आहे. कंपन्याकडून होणाऱ्या दिरंगाईला लगाम लावत दूरसंचार नियामक आयोगाने नवीन नियम लागू केले असून, पोर्टेबिलीटीच्या रिक्वेस्टवर दोन दिवसांत कारवाई करण्याचे आदेश ट्रायने दिले आहेत. विशेष म्हणजे पोर्टेबिलीटीची तक्रार ठोस कारणांशिवाय नाकारल्यास सेवा देणाऱ्या संबंधित कंपनीला दहा हजार दंड द्यावा लागणार आहे.

गेल्या काही दिवसांत मोबाईलधारकांच्या अडचणी नेटवर्कने भर टाकली आहे. त्यामुळे अनेकांचा कल नंबर पोर्टेबिलीटी करण्याकडे असतो. मात्र, या प्रक्रियेत



मोबाईल कंपन्याकडून दिरंगाई होत असल्याने अनेकांना विनाकारण त्रास सहन करावा लागतो. मोबाईल ग्राहकांची अडचण ट्रायने हेरली असून, मोबाईल नंबर पोर्टेबिली प्रक्रियेत महत्त्वाचे बदल करण्याचे आदेश टेलिकॉम कंपन्यांना दिले आहेत. एकाच सर्कलमधील मोबाईल नंबर पोर्टेबिलीटीच्या रिक्वेस्टवर दोन दिवसात, तर दोन वेगवेगळ्या सर्कलमधील मोबाईल नंबर पोर्टेबिलीटीच्या रिक्वेस्टवर चार दिवसात कारवाई करावी, असे ट्रायने बजावले आहे. तसेच एखाद्या ग्राहकाची मोबाईल पोर्टेबिलीटीची रिक्वेस्ट कंपनी कोणतेही ठोस कारण न देता फेटाळून लावत असेल तर याचा भूर्दंड कंपनीला भरावा लागणार आहे. यासाठी कंपनीला दहा हजार रुपये दंड आकारण्यात येणार आहे.